**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**१ ला मजला, विस्तार दालन क्र. १५६, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

दूरध्वनी क्र .०२२-२२०२४४५९ Email ID : desk.est-sj@mah.gov.in

सामाजिक न्याय विभागाच्या विभागीय चौकशी प्रकरणे, अर्थसंकल्पविषयक कामकाज, सेवानिवृत्ती प्रकरणे आणि वेतननिश्चितीची प्रकरणे इ. बाबींचे कामाकरीता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याबाबत:-

राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कक्ष अधिकारी / सहायक कक्ष अधिकाऱ्यांमधून १ वर्षाच्या कालावधीकरीता, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागात करार पध्दतीने ४ पदे भरावयाची आहेत.

अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का१३) दि. १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.
२. राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून कक्ष अधिकारी / सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा. मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.
३. उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज दि. ५.०८.२०२६ पर्यंत अवर सचिव( आस्था-१), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पहिला मजला (विस्तार), हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२ या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यहाराची दखल घेतली जाणार नाही.
४. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील. करार पध्दतीने नियुक्त सेवानियुक्त अधिकाऱ्यांस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.
५. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.
६. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
७. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.
८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

९. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का१३) दि. १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२४४५९ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

(विवेक शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

# अर्जाचा नमुना

प्रति,

अवर सचिव (आस्था-१),
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०००३२.

विषय : सेवानिवृत्त कक्ष अधिकारी / सहायक कक्ष अधिकारी यांची करार तत्वावर नियुक्ती करण्याबाबत...

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज करतो / करते की, मी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.०८.०१.२०१६ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून आपल्या विभागाच्या जाहिरातीत नमूद केलेले काम करण्यास इच्छुक आहे. त्यासाठी माझी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| २. | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३. | सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व विभाग | |
| ४. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ५. | जन्म दिनांक, सेवानिवृत्ती दिनांक व अर्जाच्या दिनांकास वय | |
| ६. | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक / शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ७. | अनुभव (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |
| ८. | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |
| ९. | अर्जदाराविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसलेबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| १०. | सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |
| ११. | नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील, याबाबतचे हमीपत्र. | |

ठिकाण

दिनांकः स्वाक्षरी

# हमीपत्र

मी, श्री.                                    , सेवा निवृत्त                    याद्वारे अशी हमी देतो की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेल्या जाहिरातीनुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का-१३) दि. १०.०६.२०२५ मधील अटी व शर्तीनुसार माझी कंत्राटी पध्दतीने (करार) नियुक्ती झाल्यानंतर माझेकडे नियुक्ती कालावधीत सोपविण्यात आलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील. सदर शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच करार पध्दतीने नियुक्ती मिळाल्यानंतर नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी माझ्याकडून करण्यात येणार नाही.

नाव

दिनांक-

(से.नि.पदनाम)